## प्रकरण सहावे

## पाहणीतील आढळलेल्या बाबी, निष्कर्ष आणि सूचना

## पाहणी अंती आढळलेल्या बाबी, निष्कर्ष आणि सूचना --

ह्या प्रकरणामध्ये दोन्ही खेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित ६० आणि अवंचित ६० अशा एकूण १२० मुलांच्या प्रतिसादक-पालकांच्या मुलाखत-अनुसूचिव्दारे आणि पाहणी अंती संपादित माहितीच्या विश्लेषणावरुन आढळून आलेल्या बाबी, निष्कर्ष आणि त्यावरील सूचना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) पाहणी अंती आढळलेल्या बाबी --

पाहणी अंती शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांची आर्थिक स्थिती, सामाजिक पर्यावरण, कौटुंबिक परिस्थिती, शैक्षणिक पार्श्वभूमि आणि सर्वसामान्य स्वरुपासंबंधी संपादित केलेल्या माहितीची तक्त्या-मध्ये व्यवस्थित मांडणी केली. या तक्त्यातील संपादित माहितीचे कल्पक बुध्दिच्या साहाय्याने विश्लेषण केल्यानंतर मुलांच्या शैक्षणिक वंचिततेसंबंधी काही वैशिष्ट्यपूर्ण बाबी आढळून आल्या.

(अ) आर्थिक स्थिती --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या आर्थिक स्थिती संबंधी करुन घेतलेल्या माहितीचे विश्लेषण केले असता दोन्हीही खेड्यातील वंचित मुलांच्या बहुअंशी पालकांचे कौटुंबिक दारिद्र्य असल्याचे निदर्शनास आले. मुलांच्या कौटुंबिक दारिद्र्याच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना खाली नमूद केलेल्या पाहणी अंती आढळून आलेल्या बाबीवरुन येऊ शकते.

(१) पालकांच्या व्यवसायानुसार संपादित माहितीचे विश्लेषण केले असता वंचित मुलांच्या मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण अधिक ( २६ म्हणजे ४३.३३ टक्के ) तर तुलनेने अवंचित मुलांच्या मजुरी करणाऱ्या पालकांचे प्रमाण कमी (१६ म्हणजे २६.६७ टक्के ) आढळले. मजुरी करणाऱ्या

वंचित मुलांच्या महार जातीच्या पालकांचे प्रमाण सर्वाधिक ( ११ म्हणजे ७३.३३ टक्के ) तर अवंचित मुलांच्याही मजुरी करणाऱ्या महार आणि मांग जातीच्या पालकांचे प्रमाणही अधिक ( प्रत्येकी ५ म्हणजे ३५.७२ आणि ३८.४६ टक्के ) आढळले. यावरुन इतर जातीच्या पालकांच्या तुलनेत महार आणि मांग जातीचे पालक मजुरी करणारे अधिक आढळले.

(२) पालकांच्या जमिन क्षेत्राच्या विश्लेषणावरुन ३ एकरापर्यन्त जमिनधारक असणाऱ्या अवंचित मुलांच्या कुटुंबाची संख्या सर्वाधिक म्हणजे ४४ (७३.३३ टक्के ) होती, तर वंचित मुलांच्या जमिनधारक कुटुंबाची संख्या ४१ ( म्हणजे ६८.३३ टक्के ) होती. यावरुन भूधारक कुटुंबातील मुले शालेत जाणारी आढळली.त्याच बरोबर वंचित मुलांच्या कुटुंबांच्या भूमिहीनांचे प्रमाण अधिक (१५ म्हणजे २५.०० टक्के ) आढळले तर अवंचित मुलांच्या कुटुंबांच्या भूमिहीनांचे प्रमाण कमी (१३ म्हणजे २१.६७ टक्के ) आढळले. सुतार आणि लोहार जातीच्या वंचित मुलांच्या भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण अधिक ( प्रत्येकी ३ आणि २ म्हणजे अनुक्रमे ६०.०० आणि ५०.०० टक्के ), तर मुळात मराठा जातीच्या कुटुंबांची संख्या अधिक असूनही भूमिहीन कुटुंब केवळ १ ( म्हणजे ६.२५ टक्के ) आढळले.

(३) पालकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या माहितीवरुन १२० प्रतिसादक-पालकांपैकी ९९ पालक रु.६००० या किमान उत्पन्न गटात होते. परंतु यामध्ये तुलनेने वंचित मुलांच्या गटातील पालकांचे प्रमाण अधिक ( म्हणजे ५४.५४ टक्के ) आढळले.

(४) शालोपयोगी वस्तुंच्या सोयीपूर्तिसंबंधी संपादित माहितीच्या विश्लेषणावरुन शालोपयोगी वस्तूंची पूर्तता करण्यास वंचित मुलांच्या ४७ प्रतिसादक-पालकांनी ( म्हणजे ७८.३३ टक्के ) गरीबीमुळे त्यांची असमर्थता व्यक्त केली.शालोपयोगी वस्तूंची पूर्तता न करणाऱ्या वंचित मुलांच्या अनुसूचित जातींच्या कुटुंबांचे प्रमाण सर्वाधिक आढळून आले.

(५) व्यावसायिक कामात पालकांना मदत करण्याच्या माहितीवरुन पालकांना त्यांच्या कामात मदत करणाऱ्या वंचित मुलांचे प्रमाण अधिक (४७ म्हणजे ७८.३४ टक्के ) तर अवंचित मुलांचे प्रमाण कमी (२० म्हणजे ३३.३३ टक्के) आढळले. पालकांना त्यांच्या कामात मदत करणाऱ्या मांग ११ (म्हणजे १००.०० टक्के ), मराठा १४ ( म्हणजे ८७.५० टक्के ) महार १२ ( म्हणजे ८०.०० टक्के ) आणि चांभार ७ (म्हणजे ७७.७८ टक्के ) जातीतील वंचित मुले अधिक आढळली.

थोडक्यात वंचित मुलांच्या पालकांमध्ये मजुरी करणारांचे, भूमिहीन किंवा अल्पभूधारकांचे, अल्प उत्पन्न असणारांचे, गरीबीमुळे शालोपयोगी वस्तूंची पूर्तता करण्यास असमर्थ असणारांचे प्रमाण अधिक आढळले. या माहितीवरुन वंचित मुलांच्या पालकांची आर्थिक पार्श्वभूमी दारिद्र्याची असल्याचे आढळले. विशेष म्हणजे आर्थिक दुर्बलता मागास जातींच्या प्रतिसादक-कुटुंबामध्ये प्रकर्षाणे आढळली.

(ब) सामाजिक पर्यावरण --

शैक्षणिकदृष्टा वंचित आणि अवंचित मुलांच्या सामाजिक पर्यावरणा-संबंधी संकलीत माहितीच्या विश्लेषणावरुन खालील काही महत्वाच्या बाबी प्रामुख्याने आढळून आल्या.

(१) जातीसंबंधी संपादित माहितीच्या विश्लेषणावरुन शैक्षणिकदृष्ट्या वंचितांचे प्रमाण सर्वाधिक सुतार जातीमध्ये (५ म्हणजे ५५.५६ टक्के ) आणि त्यानंतर महार जातीमध्ये (१५ म्हणजे ५१.७२ टक्के ) आढळले. परंतु मराठा जातीच्या कुटुंबाची संख्या अधिक असूनही अल्पकुटुंबाची संख्या असणाऱ्या सुतार आणि महार जातीच्या वंचित मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळले.

(२) पालकांच्या व्यसनासंबंधीच्या माहितीवरुन वंचित मुलांच्या ६० वडील-प्रतिसादकांपैकी ३६ (म्हणजे ६०.०० टक्के ) वडीलांनी मद्य सेवन करत असल्याचे कबुल केले तर अवंचित मुलांच्या ६० वडिल - प्रतिसादकांपैकी ३६ ( म्हणजे ६०.०० टक्के ) वडिलांनी मद्य सेवन करीत नसल्याचे सांगितले. यावरुन वंचित मुलांच्या वडिलांमध्ये मद्य सेवन करण्याचे प्रमाण अधिक,तर अवंचित मुलांचे बहुअंशी वडिल मद्य सेवन करत नसल्याचे आढळले.त्याचबरोबर जुगाराचे व्यसन असणाऱ्या वंचित मुलांच्या प्रतिसादकांपैकी अगदीच नाममात्र ( म्हणजे ३ ) जुगार खेळणारे आढळले. तर अवंचित मुलांच्या वडिल-प्रतिसादकांपैकी कोणीही जुगार खेळणारे आढळले नाहीत.

(३) मुलांच्या संगतीसंबंधी संपादित माहितीचे विश्लेषण केले असता १२० प्रतिसादक कुटुंबांपैकी २१ ( म्हणजे ३५.०० टक्के ) कुटुंबातील वंचित तर १७ ( म्हणजे २८.३३ टक्के ) अवंचित मुले उनाड मुलांची संगत करणारी आढळली. म्हणजेच शिक्षणापासून अवंचित राहिलेल्या मुलांच्या तुलनेत उनाड मुलांची संगत करणारी वंचित मुले थोड्या फरकाने अधिक आढळली. उनाड मुलांची संगत करणाऱ्या महार आणि मांग या अनुसूचित जातीतील वंचित मुलांचे प्रमाण तुलनेने अधिक आढळले.

(४) मुलांच्या सामाजिक पर्यावरणाच्या माहितीवरुन ३८ (म्हणजे ६३.३३ टक्के ) वंचित मुलांना शेजारचे सामाजिक पर्यावरण प्रतिकूल लाभले असल्याचे आढळून आले. ज्यांना शेजारचे पर्यावरण प्रतिकूल लाभले त्यामध्ये वंचित मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले.

अशा प्रकारे वंचित मुलांना कौटुंबिक - शैक्षणिक पर्यावरणाचा अभाव, मद्य सेवन करणाऱ्या पालकांचे आणि मुलांची संगत करणाऱ्या मुलांचे अधिक प्रमाण, त्याचप्रमाणे शेजारचे पर्यावरण प्रतिकूल लाभले असल्याचे आढळून आले.

(क) कौटुंबिक परिस्थिती --

मुलांच्या कौटुंबिक परिस्थितीची माहिती करुन घेतली असता काही प्रमुख बाबी प्रामुख्याने आढळून आल्या, त्या अशा --

(१) घरांचा प्रकार आणि घरातील सोयीसंबंधी करुन घेतलेल्या माहितीवरुन वंचित मुलांच्या-प्रतिसादकांच्या एकूण ६० घरांपैकी ४५ ( म्हणजे ७५.०० टक्के ) प्रतिसादकांची घरे मातीची आढळली. वंचित मुलांच्या ५५ ( म्हणजे ९१.६७ टक्के ) प्रतिसादक-पालकांना, तर अवंचित मुलांच्या ४४( म्हणजे ७३.३३ टक्के ) प्रतिसादक-पालकांना निवासाची सोय अपुरी असल्याचे आढळून आले. या दोन्हीतील तुलनेत वंचित मुलांना त्यांच्यादृष्टीने निवासाची सोय अपुरी आणि गैरसोयीची असल्याचे आढळून आले. जातीनिहाय माहिती करुन घेतली असता मराठा जातीच्या प्रतिसादकांना वगळता बाकी इतर सर्व जातीच्या प्रतिसादकांनी निवासाची सोय अपुरी असल्याचे सांगितले. विद्युत दिव्याच्या सोयीबाबतही मिळालेल्या माहितीवरुन वंचित मुलांच्या ४६.६७ टक्के तर अवंचित मुलांच्या ३६.६६ टक्के घरामध्ये विद्युत दिव्याची सोय उपलब्ध नसल्याचे आढळून आले म्हणजेच अवंचितांच्या तुलनेत वंचितांच्या घरी विद्युत दिव्याच्या सोयीचा अभाव असल्याचे प्रकर्षाने आढळले.

(२) पालकांच्या वैवाहिक । कौटुंबिक स्थितीविषयी माहिती करुन घेतली असता वंचित मुलांच्या एकूण ६० कुटुंबांपैकी ८ कुटुंबे विघटित व ६ कुटुंबातंर्गत भांडणे असणारी तर अवंचित मुलांची ६ कुटुंबे विघटित व २ कुटुंबातंर्गत भांडणे असणारी कुटुंबे आढळली.त्याचबरोबर वंचित मुलांच्या ४५ तर अवंचित मुलांच्या ५२ कुटुंबामध्ये शांतता आढळली. यावरुन अवंचित मुलांच्या कुटुंबाच्या-तुलनेत वंचित मुलांना कौटुंबिक वातावरणाची अनुकूलता कमी प्रमाणात उपलब्ध असल्याचे आढळले.

(३) पालकांच्या अपत्यांविषयी माहिती करुन घेतली असता वंचित मुलांच्या पालकांच्या तुलनेत अवंचित मुलांचे पालकाचे कुटुंब तुलनेने लहान आकाराचे असल्याचे आढळले.

(४) •घरातील लहान भावंडांना सांभाळण्याच्या जबाबदारीच्या माहितीवरुन एकूण १२० प्रतिसादक-पालकांच्या मुलांपैकी लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणाऱ्या वंचित मुलांचे प्रमाण १७ (म्हणजे २८.३३ टक्के ) तर अवंचितामधून फक्त १ आढळले. लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी ठेवल्या गेलेल्या सर्व मुलीच असल्याचे आढळून आले.

थोडक्यात मुलांच्या घरातील निवासाची अपुरी सोय, विद्युत दिव्याची गैरसोय पालकांची वैवाहिक घटस्फोटितता व कौटुंबिक विघटितता, कौटुंबिक सदस्य संख्या अधिक असणे, मुलांना घरातील लहान भावंडांना सांभाळावे लागणे अशा विविध अपोषक कौटुंबिक पर्यावरण वंचित मुलांना लाभले असल्याचे आढळून आले.

(ह) शैक्षणिक पार्श्वभूमी --

दोन्ही खेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कौटुंबिक शैक्षणिक पार्श्वभूमीसंबंधी संपादित माहितीच्या विश्लेषणावरुन काही महत्वाच्या बाबी आढळल्या, त्या अशा --

(१) पालकांच्या शैक्षणिक पात्रतेसंबंधीच्या संकलित माहितीच्या विश्लेषणावरुन वंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक (३० म्हणजे ५८.८२ टक्के ) तर अवंचित मुलांच्या वडिलांच्यामध्ये कमी (१९ म्हणजे ३५.१९ टक्के ) आढळले. हे निरक्षरतेचे प्रमाण मांग आणि चांभार या अनुसूचित जातीच्या वंचित मुलांच्या वडिलांमध्ये अधिक ( प्रत्येकी ९ आणि ६ म्हणजे ९०.०० आणि ८५.७२ टक्के ) आढळले. मौजे-सांगाव खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांच्या वडिलांच्या तुलनेत मौजे-म्हाळुंगे खेड्यातील वंचित आणि अवंचित मुलांचे वडिल अधिक निरक्षर आढळले. मातांच्याबाबतीत वंचित मुलांच्या ५५ (म्हणजे ९१.६७ टक्के ) तर अवंचित मुलांच्या ४३ (म्हणजे ७२.८२ टक्के ) माता निरक्षर आढळल्या. निरक्षरतेचे हे प्रमाण मांग, चांभार आणि लोहार जातींच्या मातांच्यामध्ये सर्वाधिक आढळले. विशेषकरुन मौजे-म्हाळुंगे खेड्यातील

निवडलेल्या कुटुंबातील वंचित मुलांची एकही माता साक्षर आढळली नाही.

(२) पालकांचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन तपासला असता वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक-पालकांपैकी २६ ( म्हणजे ४३.३३ टक्के ) पालकांनी त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत नसल्याचे सांगितले, त्यात मुलांच्या शिक्षणाविषयी उदासीनता व्यक्त करणाऱ्या मांग, महार आणि चांभार या अनुसूचित जातींच्या पालकांचा विशेषत्वाने समावेश आढळून आला.

(३) मुलांच्या शाळेच्या आवडीसंबंधी संकलित माहितीच्या आधारे एकूण ६० वंचित मुलांच्या प्रतिसादक-पालकांपैकी ५१ (म्हणजे ८५.०० टक्के ) पालकांनी त्यांच्या मुलांना शाळेची आवड नसल्याचे निदर्शनास आणून दिले, तर या उलट अवंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक-पालकांपैकी केवळ २ पालकांनी त्यांच्या मुलांना शाळेची अपेक्षेप्रमाणे आवड नसल्याचे सांगितले.

(४) प्रौढशिक्षण कार्यक्रमाची पालकांना असलेल्या माहितीवरून शैक्षणिक-दृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या एकूण १२० प्रतिसादक-पालकांपैकी केवळ ८ पालकांनाच प्रौढशिक्षण कार्यक्रमाविषयी माहिती असल्याचे आढळले. परंतु कोणीही पालकाने प्रौढशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली नाही. शिवाय दोन्हीही खेड्यात प्रौढ शिक्षणाचे वर्ग भरत नसल्याचेही माहितीवरून समजले.

थोडक्यात , पालकांची निरक्षरता, मुलांच्या शिक्षणाविषयी पालकांची उदासिनता, मुलांना शाळेची आवड नसणे, प्रौढशिक्षण कार्यक्रमाविषयी पालकांचा निरुत्साह इत्यादी बाबी मुलांना त्यांच्या कुटुंबातून शैक्षणिक प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळण्यास अनुकूलता दर्शविणाऱ्या नसल्याचे आढळून आले.

(इ) सर्वसामान्यबाबी --

मौजे-सांगाव आणि मौजे-म्हाळुंगे या दोन्ही खेड्यांच्या पाहणीत मुलांच्या शैक्षणिक वंचिततेस जबाबदार ठरलेल्या सर्वसामान्यबाबी आढळून आल्या, त्या अशा --

(१) दोन्ही खेड्यात माझ्या पाहणीत सर्वसामान्यपणे मुलांच्यापेक्षा मुलींना त्यांचे पालक शिक्षणापासून वंचित ठेवत असल्याचे आढळून आले.

(२) मुलांच्या मैत्रीबाबत करुन घेतलेल्या माहितीवरुन वंचित मुलांचे शाळेला न जाणारे मित्र अधिक ( ४५ म्हणजे ७५.०० टक्के ) तर अवंचित मुलांचे शाळेला नियमित जाणारे मित्र अधिक ( ४७ म्हणजे ७८.३३ टक्के ) असल्याचे आढळून आले.

(३) पाहणीमध्ये वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक-पालकांपैकी केवळ २ प्रतिसादक-पालकांनी त्यांच्या मुलांना शाळेला न पाठविता अर्थार्जनासाठी जवळपासच्या खेड्यात आणि शहरात पाठविले असल्याचे आढळले.

(४) दोन्हीही खेड्यात ६ ते २० या वयोगटातील मुले शिक्षणापासून काहीअंशी वंचित राहिल्याचे आढळून आले.

(५) दोन्ही खेड्यात काही कुटुंबात टी.व्ही. घेतले असल्याने त्याचा परिणाम काही मुले शाळेला न जाण्यावर तर काही मुलांच्या अभ्यासावर झाला असल्याचे आढळून आले.

(६) पालकांनी करुन दिलेल्या माहितीवरुन मुलांच्या क्रिकेट खेळणे, पत्त्यांनी खेळणे अशा विविध त-हेच्या खेळांच्या आवडीमुळे काही मुले शाळेला जात नसल्याचे आढळून आले.

(७) पालकांनी सांगितल्याप्रमाणे, इयत्ता पहिली-दुसरीमध्ये वारंवार नापास झालेल्या मंदबुध्दिच्या मुलांना त्यांच्या पालकांनी शाळेला पाठविण्याचे

बंद केले असल्याचे आढळून आले.

(८) पाहणीमध्ये काही पालकांची मुले शारीरिक व्यंग असल्यामुळे शाळेला जात नसल्याचे आढळून आले.

अशाप्रकारे दोन्ही खेड्यामध्ये सर्वसामान्यपणे पालकांचे त्यांच्या मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, मुलांचे शाळेला न जाणारे मित्र, मुलांना अर्थार्जनासाठी बाहेरगावी पाठविले जाणे, दूरदर्शन प्रसाराचा दुष्परिणाम मुलांना खेळाची आवड, मुलांचे शारीरिक व्यंगत्व आणि मंदबुध्दि इत्यादी बाबी काही मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या आढळल्या.

२ : निष्कर्ष --

अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्ही खेड्यांच्या पाहणीवरुन मुलांचे कौटुंबिक दारिद्र्य, प्रतिकूल सामाजिक पर्यावरण, प्रतिकूल कौटुंबिक जीवनमान आणि पालकांची निरक्षरता व अज्ञान इत्यादी विविध घटकांच्या विश्लेषणावरुन मिळालेले निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

(अ) कौटुंबिक दारिद्र्य --

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यासकारणीभूत ठरलेल्या कौटुंबिक दारिद्र्याच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना खाली नमूद केलेल्या विविध निष्कर्षांत गोष्टींच्या आधारे येऊ शकते.

(१) वंचित मुलांचे मजुरीकरणारे पालक २६ (म्हणजे ४३.३३ टक्के ) होते, पैकी मजुरी करणारे वंचित मुलांचे महार जातीचे पालक ११ (म्हणजे ७३.३३ टक्के ) तर त्याखालोखाल मांग आणि चांभार या अनुसूचित जातीचे होते. मजुरीतून मिळणाऱ्या अल्प उत्पन्नावर कुटुंबाचा चरितार्थ भागत नसल्याने पालकांनी त्यांच्या काही मुलांचा मजुरीसाठी व इतर कामांसाठी उपयोग करुन घेतल्याकारणाने त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे.

(२) वंचित मुलांचे ३ एकरापर्यन्त अल्पजमिनधारक पालक ४१ (म्हणजे ६८.३३ टक्के) होते तर भूमिहीन पालक १५ (म्हणजे २५.०० टक्के ) होते. पालकांच्या अल्पभूमितून आणि भूमिहीनांच्या मजुरीतून मिळणाऱ्या अपुऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी पालकांनी त्यांच्या मुलांचा उपयोग करुन घेतल्याकारणाने बहुअंशी मुलांना शिक्षण घेता आलेले नाही.

(३) सर्वमार्गांनी मिळणारे किमान रु.६,००० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या वंचित मुलांची कुटुंबे ५४ (म्हणजे ९०.०० टक्के ) होती.अपुऱ्या वार्षिक उत्पन्नावर कुटुंबाच्या अत्यावश्यक गरजांचीही पूर्तता होत नसल्यामुळे पालकांनी त्यांच्या मुलांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा म्हणून उपयोग करुन घेतल्याकारणाने त्यांना शिकता आलेले नाही.

(४) शालोपयोगी वस्तुंच्या सोयीची पूर्तता करण्यास वंचित मुलांचे ४७ (म्हणजे ७८.३३ टक्के ) पालक असमर्थ होते. पैकी सर्वाधिक चांभार ९ (म्हणजे १००.०० टक्के )महार १४ (म्हणजे ९३.३४ टक्के ) आणि मांग ९ (म्हणजे ८१.८२ टक्के ) या अनुसूचित जातीचे पालक त्यांच्या मुलांना शालोपयोगी वस्तुंचा पुरवठा करण्यास असमर्थ ठरल्याकारणाने बहुअंशी मुलांना शिक्षण घेता आलेले नाही.

(५) पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करणारी वंचित मुले ४७ (म्हणजे ७८.३४ टक्के ) होती. पैकी सर्वाधिक मांग ११ (म्हणजे १००.०० टक्के ) ,मराठा १४ (म्हणजे ८७.५० टक्के ), महार १२ (म्हणजे ८०.०० टक्के ) आणि चांभार ७ (म्हणजे ७७.७८ टक्के ) जातीतील बहुतांशी वंचित मुलांना त्यांच्या पालकांच्या व्यावसायिक कामात मदत करावी लागल्यामुळे शिकता आलेले नाही.

थोडक्यात , कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून मुलांचा वापर, मुलांच्या शालोपयोगी वस्तुंच्या सोयी पूर्ततेचा अभाव,पालकांच्या व्यावसायिक कामात मुलांचे सहकार्य इत्यादी विविध कौटुंबिक दारिद्र्याच्या परिस्थितीमुळे

मुलांना शिक्षण घेता आलेले नाही हे स्पष्ट होते.

(ब) प्रतिकूल सामाजिक पर्यावरण --

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणभूत ठरलेली प्रतिकूल सामाजिक परिस्थिती खाली नमूद केलेल्या निष्कर्षीत बाबींच्या आधारे स्पष्ट होऊ शकते --

(१) पाहणीमध्ये सुतार ५ (म्हणजे ५५.५६ टक्के ) आणि महार १५ ( म्हणजे ५१.७२ टक्के ) जातीमधील मुलांना त्यांच्या जातीच्या प्रतिकूल सामाजिक पर्यावरणाच्या प्रभावी परिणामामुळे शिक्षण घेण्यास योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन न मिळाल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे.

(२) दोन्ही सेव्यात मद्य सेवन करणाऱ्या ३६ (म्हणजे ६०.०० टक्के ) व्यसनाधिन पालकांचे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांच्या बहुतांशी मुलांना शिकता आलेले नाही.

(३) उनाड मुलांची संगत करणारी २१ (म्हणजे ३५.०० टक्के ) कुटुंबातील मुले वंचित होती पैकी उनाड मुलांच्या संगतीमुळे महार, मांग या अनुसूचित जातीच्या कुटुंबातील सर्वाधिक मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे.

(४) शेजारचे प्रतिकूल सामाजिक पर्यावरण दोन्ही सेव्यातील वंचित मुलांच्या ३८ (म्हणजे ६३.३३ टक्के ) कुटुंबात होते पैकी शेजारच्या प्रतिकूल सामाजिक पर्यावरणाच्या अनिष्ट परिणामामुळे मांग ९ (म्हणजे ८१.८२ टक्के ) आणि महार १२ (म्हणजे ८०.०० टक्के ) या अनुसूचित जातीच्या कुटुंबातील बहुतांशी मुले शिक्षण घेत नाहीत.

अशा प्रकारे मुलांना उपलब्ध असलेले सामाजिक पर्यावरण, पालकांची व्यसनाधिनता, मुलांची कुसंगती इत्यादी विविध प्रतिकूल सामाजिक घटकांच्या प्रभावी परिणामामुळे बहुअंशी मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले.

(क) कौटुंबिक जीवनमान --

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास जबाबदार ठरलेल्या कौटुंबिक जीवनाची स्पष्टकल्पना खाली उल्लेख केलेल्या गोष्टीवरुन येऊ शकते --

(१) वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक-पालकांच्या ५५ (म्हणजे ९१.६७ टक्के ) कुटुंबात निवासाची अपुरी आणि गैरसोय असल्याकारणाने त्या कुटुंबातील बहुतांशी मुलांना शिक्षण घेता आलेले नाही.

(२) वंचित मुलांच्या पालकांची ८ कुटुंबे विघटित तर ६ कुटुंबात अंतर्गत भांडणे असल्यामुळे पालकांचे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहेत.

(३) पाहणीत ५ ते ८ अपत्य असणाऱ्या आणि ९ ते १२ पर्यन्त अधिक कुटुंब-सदस्य संख्या असलेल्या पालकांना त्यांच्या मुलांच्याकडे साहनुभूतिपूर्वक आणि वैयक्तिक स्वरुपात लक्ष पुरविता न आल्यामुळे त्यांची काही मुले शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित झालेली आहेत.

(४) दोन्ही खेड्यातील विशेषकरुन १७ (म्हणजे २८.३३ टक्के ) मुलींना त्यांच्या पालकांनी घरातील कामे व लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी ठेवून घेतल्याने त्यांची शिकण्याची इच्छा असूनही त्यांना शिकता आलेले नाही.

थोडक्यात, मुलांची निवासाची अपुरी व गैर सोय, घटस्फोटित व अंतर्गत भांडण असणारी कुटुंबे, अधिक अपत्य व कुटुंबसदस्यसंख्या आणि मुलींना घरकामासाठी व लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी ठेवून घेतले जाणे इत्यादी कौटुंबिक जीवनपध्दती-मुळे मुले शिक्षण घेऊ शकलेली नाहीत.

(ड) <u>पालकांची निरक्षरता व अज्ञान --</u>

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरलेली पालकांची निरक्षरता व अज्ञान याची कल्पना खालील निष्कर्षांति गोष्टीवरून येऊ शकते --

(१) वंचित मुलांचे वडिल ३० ( म्हणजे ५८.८२ टक्के ) तर माता ५५( म्हणजे ९१.६७ टक्के ) निरक्षर होत्या पैकी सर्वाधिक निरक्षरता अनुसूचित जातीच्या पालकांच्यामध्ये असल्याने त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जाणीव व महत्व पटलेले नसल्याकारणाने त्यांची बहुसंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आहेत.

(२) दोन्ही खेड्यात ६० वंचित मुलांच्या पालकांपैकी २६ (म्हणजे ४३.३३ टक्के ) पालकांना त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत नव्हते.मुलांच्या शिक्षणाविषयी महार,मांग आणि चांभार या अनुसूचित जातीच्या सर्वाधिक पालकांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयी उदासिनता दर्शविल्यामुळे त्यांची बहुअंशी मुले शिक्षण घेण्यापासून अलिप्त राहिली आहेत.

(३) वंचित मुलांच्या ६० प्रतिसादक पालकांपैकी सर्वाधिक ५१ (म्हणजे ८५.०० टक्के) पालकांच्या मुलांना शाळेची आवड नसल्यामुळे त्यांची बहुंशी मुले शिक्षण घेऊ शकलेली नाहीत.

(४) दोन्ही खेड्यातील वंचित मुलांच्या जवळ-जवळ सर्वच पालकांनी प्रौढशिक्षण घेण्यास निरुत्साह व्यक्त केल्यामुळे या अज्ञान पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची किंमत समजू न शकल्यामुळेच ते त्यांच्या मुलांना काळजीपूर्वक शिकविण्यास राजी नसतात. याचाच परिणाम त्यांची मुले शिक्षण घेण्यापासून वंचित राहण्यात झाला आहे.

अशाप्रकारे मुलांच्या माता-पित्यांची निरक्षरता व अज्ञान,मुलांच्या शिक्षणाविषयी पालकांची उदासिनता,मुलांना शाळेची आवड नसणे इत्यादी कारणांच्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आहेत.

(इ) इतर कारणे --

मुले शिक्षणापासून वंचित राहाण्यास इतरही काही कारणे जबाबदार आहेत ती अशी ---

(१) खेड्यातील अशिक्षित पालक त्यांच्या मुलींचा घरकामासाठी, शेतीकामासाठी व मजुरीसाठी उपयोग करुन घेत असल्याकारणाने सर्वाधिक मुली शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आहेत.

(२) पाहणीमध्ये वंचित मुलांचे सर्वाधिक (४५.म्हणजे ७५.०० टक्के ) मित्र शाळेला न जाणारे होते त्यामुळे शैक्षणिक वातावरण निर्मिती न होऊन मुलांच्या मनात शाळेची आवड निर्माण झाली नाही, याचाच परिणाम काही मुले शिक्षणापासून वंचित राहाण्यात झाला.

(३) शासनाच्या दूरदर्शन प्रसारणाचा मुलांच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झालेला आहे. काही पालकांची लहान मुले दूरदर्शनवरील क्रिकेट खेळ, सिनेमा व इतर कार्यक्रम पाहण्यात आकर्षित झाली होती अशी काही मुले दिवसभर क्रिकेटने खेळण्यात दंग झाल्यामुळे शाळेला गेलेली नाहीत.

(४) काही मुलाना शारीरिक व्यंग होते अशी मुले संकोच्याने शाळेला न गेल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिली आहेत.

(५) पालकांची काही मुले मंदबुध्दिची होती. गुरुजींनी शाळेत शिकविलेले वाचता व लिहिता न आल्यामुळे घाबरुन काही मुलांनी शाळेस जाने बंद केले होते.

थोडक्यात मुलींचा घरकामासाठी व शेतमजुरीसाठी उपयोग, मुलांचे शाळेला न जाणारे मित्र, दूरदर्शनचे कार्यक्रम बघण्याची आवड, शारीरिक व्यंग आणि मुलांची मंदबुध्दि इत्यादी कारणांच्यामुळे काही मुले शिक्षण घेऊ शकलेली नाहीत.

एकंदरीत अभ्यास विषयाच्या निष्कर्षांत गोष्टींचा मागोवा घेतल्यानंतर खेड्यामध्ये मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास मुलांच्या कुटुंबाचे दारिद्र्य, मुलांचे प्रतिकूल सामाजिक पर्यावरण, पालकांची निरक्षरता व अज्ञान आणि मुलांची कौटुंबिक असाहाय्यक परिस्थिती ही कारणे विशेषत्वाने जबाबदार असल्याचे नि:संशय स्पष्ट आहे.

३ - सूचना --

अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्ही खेड्यांच्या पाहणीअंती आढळलेल्या बाबी आणि काढलेले निष्कर्ष यावरुन मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास अनेक प्रमुख कारणे प्रामुख्याने प्रभावीपणे जबाबदार असल्याचे आढळून आले. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत अडचण ठरलेल्या गोष्टीचे निराकरण करण्यानेच मुलांना शिक्षणाच्या संधीचा लाभ खऱ्या अर्थाने मिळणार आहे. या दृष्टिकोणातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व इथूनपुढे वंचित राहण्याची शक्यता असणाऱ्या मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी समाजाला किंबहुना शासनाला उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरतील अशा सूचना मी या ठिकाणी देण्याचा प्रयत्न करीत आहे त्या अशा ---

१) खेड्यातील पालकांच्या दारिद्र्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून पालक मुलांचा रोजगारीसाठी व अन्य स्वरुपाच्या कामात साहाय्यक म्हणून उपयोग करुन घेतात. याचाच परिणाम त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहाण्यात झाला आहे. मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी मुलांच्या कौटुंबिक आर्थिक स्थितीत किंवा राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनाने 'नविन ग्रामीण विकास कार्यक्रम' तयार करुन कार्यवाहीत आणला पाहिजे. खेड्यातील अल्पभूधारक, भूमिहीन, दरिद्री, बेरोजगार, दुर्बल आणि मागासवर्गीय जातीच्या लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पोषक वातावरण असलेल्या ग्रामीण भागात अधिकाधिक औद्योगिक केन्द्रे सुरु करावीत आणि या औद्योगिक केन्द्रातून शासनाने 'ग्रामीण सक्षणाच्या'

आधारे गरीब, दारिद्र्यरेषेखालील जीवनमान असणाऱ्या बेरोजगार लोकांचीच निवड करुन त्यांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे गरीब, दारिद्र्यरेषेखालील जीवनमान असणाऱ्या लोकांच्या आर्थिक स्थितीत आणि जीवनमानात सुधारणा घडून येऊन पालक त्यांच्या मुलांचे शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

परंतु आज याबाबतची परिस्थिती अगदी उलटी आहे. अधिकाधिक औद्योगिक केन्द्राची स्थापना शहरात किंवा शहराच्या जवळपास केली जात आहे. आणि या औद्योगिक केन्द्रातून मध्यम, उच्च वर्गातील आणि संबंधित लोकांनाच अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. परंतु ग्रामीण भागातील गरीब, कुशल व अकुशल बेरोजगार लोकांना या औद्योगिक क्षेत्रात रोजगाराची संधी न देता त्यांना आर्थिक विकासाच्या संधीपासून वंचित ठेवले जात आहे. सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी ग्रामीण भागातील गरीब, भूमिहीन, मागास जाती-जमातीच्या लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊन त्यांचा सर्व बाजूनी कायापालट घडवून आणण्यासाठी ग्रामीण भागात औद्योगिक केन्द्रे सुरु करण्याची हाक दिली आहे.

२) खेड्यातील सुतार, लोहार, मांग आणि चांभार जातीच्या मुलांना त्यांच्या कुटुंबाच्या गरीबीच्यापरिस्थितीमुळे शिक्षण घेता आलेले नाही. या जातीच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांच्या प्राथमिक अवस्थेतील जात व्यवसायात विकास घडवून आणण्यासाठी शासनाने योग्य ते आर्थिक साहाय्य व मार्गदर्शन करुन त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणावी. त्यामुळे या जातीच्या मुलांना शिक्षण घेता येणे शक्य होईल.

३) खेड्यातील अल्पभूधारक, भूमिहीन, सुशिक्षित बेकार आणि गरीब बेरोजगार लोकांना व्यापार आणि लघु उद्योग सुरु करण्यासाठी शासनाने योग्य ते आर्थिक साहाय्य व मार्गदर्शन करावे, त्यामुळे पालकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांना मुलांचे शिक्षण पूर्ण करता येणे शक्य होईल.

४) शालोपयोगी वस्तूंच्या सोयी पूर्ततेच्या अभावामुळे काही मुले शिक्षण घेऊ शकलेली नाहीत. अशा मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी शासनामार्फत मोफत पाठ्य-पुस्तके, शाळेचा गणवेश व इतर शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा, त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांच्या संख्येत घट होण्यास मदत होईल.

५) शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे सर्वाधिक प्रमाण अनुसूचित जातीमध्ये व त्यानंतर इतर जातीमध्ये आढळले. विशेष करून सर्वाधिक वंचित राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत जाणीवपूर्वक बदल घडवून आणण्याच्यादृष्टीने त्यांच्यासाठीच्या घटनात्मक तरतुदींची काळजीपूर्वक पूर्तता करण्यात यावी.

६) खेड्यातील मद्य सेवनाचे व्यसन असणाऱ्या पालकांच्या दुर्लक्षातेमुळे त्यांची काही मुले शिक्षणापासून वंचित आढळली. पालकांनी मद्य सेवनापासून अलिप्त राहावे यासाठी मद्य व जुगार व्यसनाच्या प्रतिबंधाबाबत रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे आणि भिंती पत्रके इत्यादीव्दारे प्रसार अधिक करण्यात यावा. खेड्यातून मद्य निर्मिती व विक्री करण्यावर पूर्णपणे प्रतिबंध घालावा. शिवाय बेकायदा दारु गाळणाऱ्या व विक्री करणाऱ्या लोकांना कडक शिक्षेचा अवलंब करावा त्यासाठी पोलिस यंत्रणेला दक्ष राहण्याची सक्ती करण्यात यावी. याशिवाय खेड्यातून दारुबंदी सप्ताह, दारुबंदी विषयक शिबिरे आणि दारुबंदी विषयक व्याख्याने इत्यादी कार्यक्रमाव्दारे खेड्यातील लोकांचे प्रबोधन करुन त्यांना मद्यपानाच्या व जुगाराच्या दुष्परिणामांची जाणीव करुन देऊन पालकांना या व्यसनापासून दूर करण्याचा प्रयत्न व्हावा.

परंतु खेड्यामध्ये मद्य निर्मितीचे व विक्री करण्याचे प्रमाण वाढत आहे याकडे पोलिस यंत्रणा जाणूनबुजून दुर्लक्ष करते की काय अशी शंका मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. यादृष्टीने शासनाने पोलिस यंत्रणेस योग्य ते आदेश

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

देऊन ठोस पाऊल उचलण्याची गरज आहे. त्यामुळे मद्य निर्मिती व विक्री करण्यावर साहजिकच प्रतिबंध येऊन लेड्यातील पालकांच्या मद्य सेवनाच्या प्रमाणात घट होईल व त्यांना मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देता येईल.

७) मुलांचे शेजारचे प्रतिकूल सामाजिक पर्यावरण आणि त्यांची उनाड मुलांची संगत यामुळे काही मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहेत. अशा मुलांना शिक्षणापासून वंचित राहता येऊ नये यासाठी पालकांना प्रौढ शिक्षणाव्दारे साक्षर करुन मुलांच्या शिक्षणाचे त्यांना महत्त्व पटून ते त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष देतील व शेजारचे प्रतिकूल सामाजिक पर्यावरण अनुकूल बनवू शकतील. त्यादृष्टिने प्रौढ शिक्षण कार्यक्रम अधिक व्यापक करण्यात यावा.

सध्या प्रौढशिक्षण कार्यक्रम काही विशिष्ट लेड्यामध्येच राबविला जात आहे. शिवाय प्रौढशिक्षणाला लेड्यातील प्रौढांचा योग्य असा प्रतिसाद मिळत नाही असे दिसून येते त्यामुळे प्रौढशिक्षण हा कार्यक्रम कागदोपत्रीच अधिक प्रमाणात राबविला जात असल्याची शंका निर्माण होते.

८) लेड्यातील बहुसंख्य पालकांच्या निवासाची अपुरी व गैरसोय असल्यामुळे त्याची सर्वाधिक मुले शिक्षणापासून वंचित राहिली आहेत आशा मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी अपुरी निवासाची सोय असलेल्या व गरीब बेघर लोकांना त्यांच्या गावातील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गावठाण जागेत घरे बांधून देण्यासाठी शासनाने ' ग्रामीण घरबांधणी कार्यक्रम ' तयार करावा व कार्यवाहीत आणावा. त्यामुळे मुलांच्या निवासाची योग्य सोय होऊन त्यांना शिक्षण घेता येणे शक्य होईल.

९) पालकांच्या वैवाहिक घटस्फोटित व कौटुंबिक विघटित स्थितीमुळे त्यांची काही मुले शैक्षणिकदृष्ट्या वंचित राहिली आहेत. या मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी अशा दुर्लक्षित मुलांची ग्रामपचायतीमार्फत नोंद करुन घेण्यात यावी व त्यांच्यासाठी तालुका पातळीवर ' ग्रामीण दुर्लक्षित मुलांच्या आश्रम शाळा ' स्थापन कराव्यात व मुलांचे शिक्षण पूर्ण करण्याची

हमी अशा शाळांनी घ्यावी.

१०) अधिक अपत्य व कुटुंब सदस्यसंख्या असलेल्या पालकांची काही मुले शिक्षण घेऊ शकलेली नाहीत. त्यासाठी पालकांनी एक किंवा दोनच अपत्यांना जन्म देऊन त्यांचे कुटुंब मर्यादित ठेवून मुलांचे शिक्षण पूर्ण करावे. खेड्यातील अधिकाधिक लोकांनी कुटुंब नियोजन करुन घ्यावे यासाठी खेड्यातील लोकांचे कुटुंब नियोजन विषयक असलेले गैरसमज व अंध:श्रध्दा दूर करुन त्यांना कुटुंब नियोजनाची उपयुक्त माहिती करुन देण्यासाठी कुटुंबनियोजन विषयक शिबिरे, व्याख्याने आयोजित करावीत व लोकांच्यात प्रबोधन घडवून आणावे.

११) खेड्यात सर्वाधिक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास त्यांचे पालक जबाबदार असल्याचे दिसून आले. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जावू नये यासाठी मुलांच्याप्रमाणे मुलींनाही शिक्षण देण्याची पालकांच्यावर कायदेशिर सक्ती करण्यात यावी.त्याच बरोबर मुलींनी शिक्षण घ्यावे यासाठी मोफत शिक्षणाची व वसतिगृहांची सोय तालुका पातळीवर करण्यात यावी. असे झाल्यास मुलींच्या साक्षरतेत वृध्दी होईल.

१२) पालकांची निरक्षरता ही त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरली आहे. मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी पालकांना ( विशेषत: मातांना ) प्रौढशिक्षण कार्यक्रमाव्दारे साक्षर करण्याची गरज आहे. प्रौढशिक्षण देण्यासाठी सर्वाधिक महिला शिक्षिकांची नेमणूक करण्यात यावी. त्यामुळे खेड्यातील स्त्रियांची प्रौढशिक्षण वर्गात अधिक उपस्थिती राहिल.त्याच बरोबर पुरुष आणि स्त्रिया असे मिळून प्रौढ शिक्षणाचे वर्ग न भरविता स्त्रीयांचे प्रौढशिक्षणाचे वर्ग वेगळे भरवावेत, त्यामुळे मातांच्या साक्षरतेत वाढ होऊन त्यांच्यात त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जाणीव निर्माण होईल. याचाच परिणाम वंचिततेच्या प्रमाणात घट होण्यात होईल.

१३) मुलांनी शिक्षण घेऊन त्यांना नोकरी-धंदा मिळण्याची पालकांना आशा वाटत नाही, असे आशाहीन पालक त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. तेव्हा शासकिय आणि खाजगी क्षेत्रात शिक्षण घेतलेल्या मुलांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टिने शासनामार्फत प्रयत्न झाले पाहिजेत. त्यामुळे पालकांच्यामध्ये त्यांच्या मुलांना नोकरी-धंदा मिळण्याची आशा वाढून ते त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याची काळजी घेतील व वंचिततेच्या प्रमाणात घट होईल.

१४) मुलांना शाळेची आवड नसल्यामुळे मुले शाळेला जात नाहीत. तेव्हा मुलांना शाळेची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न पालक आणि शिक्षकांकडून झाले पाहिजेत. पालकांनी मुलांना काही आमिश दाखवावे किंवा त्यांच्या आवश्यक आकांक्षांची पूर्तता करावी. शाळेमध्ये मधल्यासुट्टीत मुलांना दुध वाटण्यात यावे. विशेषत:शाळेतील कडक शिस्त आणि शिक्षकांची ताठरभूमिका यामुळे काही मुले शिक्षकांना घाबरुन शाळेला जात नाहीत किंवा शाळेला जाण्यास टाळाटाळ करतात, त्यासाठी शिक्षकांनी त्यांची ताठर भूमिका सोडून देऊन लहान मुलांच्यामध्ये पूर्णपणे मिसळून जावे. मुलांना गाणी, नकला, खेळ, गोष्टी सांगणे व काही वेळेला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करावेत. त्यामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण होण्यास मदत होईल. त्याच - बरोबर शिक्षकांनी मुलांच्या पालकांना वारंवार भेटण्यास बोलवावे व त्यांना मुलांच्या शिक्षणाची जाणीव करुन द्यावी. जी मुले-मुली वारंवार गैरहजर राहातात त्यांच्या घरी जावे व मुले शाळेला न येण्यामागची परिस्थिती समजावून घेऊन त्यासंबंधी योग्य तो सल्ला पालकांना द्यावा. तीन किंवा सहा महिन्यातून शाळेमध्ये पालक सभा घेण्यात याव्यात व त्यातून पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न व्हावा. त्याच बरोबर गावच्या गाव - सभेच्यावेळी ग्रामसेवक, सरपंच व शिक्षक यांच्यामार्फत मुलांना शाळेला पाठवून देण्याबद्दल पालकांना मार्गदर्शन करण्यात यावे. असे झाल्यास साहजिकच मुलांच्या शैक्षणिक वंचिततेच्या प्रमाणात घट होईल.

१५) दूरदर्शनाचा काही अंशी मुलांच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला आहे. दूरदर्शन व रेडिओ इत्यादी प्रसार साधनांच्या माध्यमातून ' मुलांच्या शिक्षणाचे महत्व ' या विषयी भाषणे व अन्य शैक्षणिक कार्यक्रम जास्तजास्त स्वरुपात प्रसारीत करण्यात यावेत.त्यामुळे पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्व पटेल व ते त्यांच्या मुलांना काळजीने शिक्षण देतील.

१६) खेड्यातील शारिरीक व्यंग व मंदबुध्दिच्या मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी तालुकापातळीवर अशा मुलांच्यासाठी शिक्षणाची वेगळी मोफत सोय करण्यात यावी.

परंतु, अद्याप खेड्यातील आंधळ्या,बहिऱ्या,मुक्या,लुळ्या - पांगळ्या आणि मंदबुध्दिच्या मुलांच्यासाठी म्हणाव्यातशा वेगळ्या शिक्षण संस्था निर्माण झालेल्या नाहीत. याचाच परिणाम अशीमुले शैक्षणिकदृष्टया उपेक्षित राहिलेली आहेत.

थोडक्यात , खेड्यातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी मुलांच्या पालकांच्या आर्थिक,सामाजिक,कौटुंबिक आणि शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे अत्यावश्यक आहे.